क्र शासाउ - १०.१३/सं क्र.६६९/सा.उ

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :— ०८/०८/२०१३.

प्रति,

व्यवस्थापकीय संचालक,
सर्व महामंडळ.

विषय: शासकीय वाहनांवर लाल/अंबर दिवा वापराच्या अनुज्ञेयतेबाबत आणि वाहनांच्या काचांवरील dark films काढून टाकणेबाबत सूचना.

संदर्भ:- वित्त विभाग,क्र.संकीर्ण-१०१३/प्र.क्र.३१६/प्रशा-५,यांचे दिनांक ९/७/२०१३चे पत्र.

---

महोदय,

उपरोक्त विषयी सोबत जोडलेले दिनांक ९/८/१२ चे परिपत्रक/आदेश दिनांक २०/१०/२०१२ चे प्रधान सचिव (परिवहन) यांचे परिपत्रक,दिनांक ३/६/२०१३ चे मा.मुख्यसचिवांचे परिपत्रक कृपया पहावे. आपल्या महामंडळाकडील वाहनांसदंर्भात या परिपत्रकांन्वये दिलेल्या निर्देशांचे कटाक्षाने पालन करण्यात यावे.

आपला,

(नं. वि. पाटील)
अवर सचिव, वित्त विभाग.

सोबत : वरीलप्रमाणे.

महाराष्ट्र शासन

तात्काळ / कालमर्यादा

क्रमांक : संकीर्ण-२०१३/प्र.क्र.३१६/प्रशा-५,
वित्त विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक -- ९ जुलै, २०१३.

प्रति,

१) उप सचिव, विक्रीकर प्रशासन,
२) उप सचिव, कोषा प्रशासन,
३) उप सचिव, सार्वजनिक उपक्रम,
४) उप सचिव, राज्य लॉटरी व अल्पबचत आणि विमा प्रशासन.

विषय :- शासकीय वाहनांवर लाल / अंबर दिवा वापराच्या अनुज्ञेयतेबाबत.

संदर्भ :- १) गृह विभाग परिपत्रक क्रमांक एमव्हीआर-०५१२/प्रक्र-७४/पुनर्बांधणी-१८/परि-२, दिनांक ९.८.२०१२ व २०.१०.२०१२.

२) गृह विभाग परिपत्रक क्रमांक एमव्हीआर-०२१३/प्रक-४७/पु.बां.८०/परि-२, दिनांक ३.६.२०१३ व दिनांक ४.७.२०१३ चे पत्र.

३) या विभागाचे समक्रमांकाचे दिनांक २४.६.२०१३ चे पत्र.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयावरील प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग यांचे परिपत्रकान्वये शासकीय वाहनांवर लाल / अंबर दिव्याचा वापर करण्याबाबत व वाहनांवरील काचेच्या काळ्या फिल्म्स् (Black Films) काढण्याबाबत तसेच त्यांचा वापरण्यास बंदी याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. (सुलभ संदर्भासाठी प्रती सोबत जोडल्या आहेत). या आदेशांचे पालन आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांनी करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर निर्देशास अनुसरुन मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३.६.२०१३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत सोबत जोडली आहे. इतिवृत्तातील निर्णय घेण्यात आलेल्या मुद्याबाबत गांभियाने लक्षात घेऊन शासकीय वाहनांना लावण्यात आलेल्या काळ्या फिल्म्स तात्काळ काढून टाकण्यात याव्यात. तसेच ज्या अधिकाऱ्यांना लाल / अंबर दिवा अनुज्ञेय आहे अशा अधिकाऱ्यांनीच त्याचा वापर करावा. अन्य अधिकाऱ्यांच्या वाहनावरील लाल / अंबर दिवा तातडीने काढून टाकण्याची कार्यवाही करण्यात यावी. या आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे करुन तात्काळ कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला,

(शिवाजी सु. धामणकर)
कक्ष अधिकारी, वित्त विभाग.

सोबत : सहपत्र

प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सहपत्रांसह तात्काळ कार्यवाहीस्तव रवाना.
२) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सहपत्रांसह तात्काळ कार्यवाहीस्तव रवाना.
३) आयुक्त, राज्य लॉटरी व अल्पबचत, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सहपत्रांसह तात्काळ कार्यवाहीस्तव रवाना.
४) संचालक, विमा प्रशासन, म्हाडा इमारत, बांद्रे (पूर्व), मुंबई - ५१ यांना सहपत्रांसह तात्काळ कार्यवाहीस्तव रवाना.

महत्वाच्या /अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या वाहनांचे विन्डस्क्रिन आणि खिडक्यांच्या काचेवर ब्लॅक फिल्म्सचा वापर करण्यासाठी परवानगी देणे.

केंद्रीय मोटार वाहन नियमातून सूट देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग (परिवहन)

शासन निर्णय क्र.एमव्हीआर-०५१२/प्र.क्र.१७४/पुनर्बांधणी क्र-१८/परि-२,
मंत्रालय, जागतिक व्यापार केंद्र कफ परेड, मुंबई ०५,दिनांक ९ ऑगस्ट, २०१२

**वाचा:-** १) विशेष पोलीस महानिरीक्षक (का व सू) पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, मुंबई यांचे क्र.डीजीपी/१४/६६/डब्ल्यूपी.सिव्हील/२८५/२०१२, दि. ७.५.२०१२

२) शासन पत्र समक्रमांक दि.२१ मे, २०१२

**प्रस्तावना-:** श्री.अविषेक गोयंका यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका क्र.२६५/२०११ दाखल करुन ब्लॅक फिल्मच्या वापरास प्रतिबंध करण्याबाबत कार्यवाही करण्याचे आदेश सर्व संबंधित प्राधिकाऱ्यांना देण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयास विनंती केली आहे. प्रस्तुत याचिकेवर दिनांक २७.४.२०१२ रोजी झालेल्या सुनावणीअंती मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार विशेष पोलीस महानिरीक्षक (का व सू) यांनी पोलीस विभागास आवश्यक कार्यवाही होण्यासाठी संदर्भाधीन क्र.(१) दिनांक ७.५.२०१२ च्या पत्रान्वये निदेश दिलेले आहेत. तसेच संदर्भ क्र.(२) च्या शासन पत्रान्वये प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेश देण्याबाबत परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना निदेश देण्यात आलेले आहेत.

२. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महत्वाच्या /अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या वाहनांच्या विंडस्क्रिन व खिडक्यांच्या काचेवर ब्लॅक फिल्म्सचा वापर करण्यासाठी परवानगी देऊन केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियमातून सूट देण्याच्याअनुषंगाने प्रमाणपत्र देण्यासाठी तपासणी समिती गठित करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** महत्वाच्या /अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या वाहनांच्या विन्डस्क्रिन व खिडक्यांच्या काचेवर ब्लॅक फिल्म्सचा वापर करण्यासाठी परवानगी देऊन केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियमातून सूट देण्यासंदर्भात विचार करुन प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेण्यासाठी पुढीलप्रमाणे समितीच्या रचनेस शासन मान्यता देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | अपर मुख्य सचिव (गृह) | |
| २) | पोलीस महासंचालक | अध्यक्ष |
| ३) | प्रधान सचिव (परिवहन) | सदस्य |
| ४) | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई | सदस्य |
| ५) | उप सचिव (पोल-८) | सदस्य |
| | | सदस्य सचिव |

२. वरील समिती आवश्यतेनुसार बैठकीचे आयोजन करुन प्रस्तावाची तपासणी करुन प्रमाणपत्र देण्याबाबत निर्णय घेईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(डॉ.शैलेश कुमार शर्मा)
प्रधान सचिव (परिवहन)

प्रति,

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
सर्व विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव यांचे स्वीय सहायक
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक)
उप सचिव (पोल-८), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ०५
सर्व पोलीस आयुक्त
सह पोलीस आयुक्त,(वाहतूक) वरळी, मुंबई
परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व पोलीस अधीक्षक
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी
सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
निवडनस्ती.

शासकीय वाहनांच्या काचांवरील
काळ्या फिल्मस् काढून टाकण्याबाबत

महाराष्ट्र शासन

परिपत्रक क्रमांक : एमव्हीआर-0512/प्रक्र-74/पुनर्बांधणी-18/परि-2

गृह (परिवहन) विभाग, मंत्रालय

जागतिक व्यापार केंद्र, 30 वा मजला,

कफ परेड, मुंबई 400 005

दिनांक 20 ऑक्टोबर 2012

## परिपत्रक

केंद्रिय मोटार वाहन कायद्याखाली बनविलेल्या नियमांमधील नियम 100 नुसार वाहनांच्या समोरील, मागील तसेच बाजूच्या खिडकीच्या काचांची पारदर्शकता अनुक्रमे किमान 70 टक्के व 50 टक्के असणे बंधनकारक आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने अभिषेक गोयंका विरुध्द भारत सरकार या जनहित याचिका क्रमांक 265/2011 मध्ये दिनांक 27 एप्रिल 2012 रोजी सर्व राज्यांना निर्देश दिले आहेत की, वाहनांच्या काचांवर कोणत्याही प्रकारच्या काळ्या फिल्मस् किंवा इतर पदार्थ (मटेरियल) लावू नये. लावल्यास पोलीसांनी / संबंधित अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी त्या काढून टाकाव्यात.

2. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्देशानुसार कोणत्याही वाहनांच्या खिडक्यांच्या काचांवर तसेच समोरील व मागील काचांवर काळ्या फिल्मस् किंवा इतर पदार्थ लावणे बेकायदेशीर आहे. या संबंधात पोलीस महासंचालक आणि परिवहन आयुक्त यांनी, त्यांच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांना, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी, कार्यवाही करण्याचे व दोषी आढळून आलेल्या वाहनांवर कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत. वाहतूक पोलीसांनी अलीकडे याबाबत वाहनांच्या काचांवरील फिल्म काढून टाकण्याची मोहिमही सुरु केली आहे. परिवहन कार्यालयांमधूनसुध्दा व्यापारी वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्राच्यावेळी व नवीन वाहनांच्या नोंदणीच्यावेळी उपरोक्त आदेशांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

3. शासनाचे निरनिराळे प्रशासकीय आणि त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग, कार्यालये यांनी सुध्दा कायद्यातील तरतुदींचे / नियमांचे व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. खाजगी वाहनांवर कारवाई करतानांच शासकीय

फिल्मस् पूर्वी लावलेल्या असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, या परिपत्रकाव्दारे सर्व मंत्रालयीन विभागांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांचे विभाग, क्षेत्रिय कार्यालये, नियंत्रणाखालील महामंडळ, मंडळ, प्राधिकरणे इत्यादी मधील वाहनांच्या काचांना काळया फिल्मस् लावू नयेत व अशा फिल्मस् पूर्वी लावलेल्या असतील तर त्या त्वरीत काढून टाकाव्यात आणि या संदर्भातील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

4. महत्वाच्या / अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या सुरक्षिततेसाठी त्यांचे वाहनांना यामधून सूट पाहिजे असलेली प्रकरणे गृह विभागातील समितीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात यावीत.

( सुमीत मल्लिक )
प्रधान सचिव (परिवहन)

प्रति
मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.मंत्री, मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव
*प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग
प्रशासनिक विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव
अपर मुख्य सचिव, राज्य निवडणूक आयोग
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
पोलीस महासंचालक, पोलीस मुख्यालय, मुंबई
अतिरिक्त महासंचालक-वाहतूक, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
परिवहन आयुक्त, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभाग प्रमुख

वाहनांवर लाल/ अंबर दिवा वापराच्या
अनुज्ञेयतेबाबत

महाराष्ट्र शासन
परिपत्रक क्रमांक : एमव्हीआर ०२१३/प्र क्र ४७/पु.वां.८०/परि-२
गृह ( परिवहन) विभाग, मंत्रालय, मुंबई
दिनांक :- ०३ जून, २०१३

वाचा : १) शासन निर्णय गृह विभाग क्रमांक एमव्हीआर ०८१०/प्र क्र ५१५/परि-२ दिनांक १७ सप्टेंबर, २०१०

२) शासन निर्णय गृह विभाग क्र. एमव्हीआर ०८१०/प्र क्र ५१५/परि-२ दिनांक ५ मार्च, २०११

३) शासन निर्णय गृह विभाग क्रमांक एमव्हीआर ०५११/प्र क्र ३१२/परि-२ दिनांक १७/०९/२०११

## परिपत्रक

केंद्रीय मोटार वाहन अधिनियम १९८९ मधील नियम १०८ नुसार वाहनांवर दिवा अनुज्ञेयतेबाबत तरतूदी केलेल्या आहेत. या अनुषंगाने शासनाने अतिमहत्वाच्या / महत्वाच्या व्यक्ती / अधिकाऱ्यांच्या वाहनांवर लाल/ अंबर दिवा अनुज्ञेय करण्याबाबत वरील संदर्भाधिन शासन निर्णयान्वये वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तथापि शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, विभागाच्या नियंत्रणाखालील अधिकारी त्यांना लाल / अंबर दिवा अनुज्ञेय नसताना देखील त्यांच्या वाहनांवर लाल/ अंबर दिव्याचा अनधिकृतपणे वापर करतात. मा. सर्वोच्च न्यायालयाने वरील संदर्भात नियमाचे तत्वत: पालन होत नसल्याने नाराजी व्यक्त केली आहे.

२. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरुन या परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात येत आहेत की, सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील विभागीय कार्यालये / क्षेत्रीय कार्यालये / महामंडळे / मंडळे / प्राधिकरणे इत्यादी मधील ज्या अधिकाऱ्यांना लाल / अंबर दिवा अनुज्ञेय आहे, अशा अधिकाऱ्यांनीच त्याचा वापर करावा. अशा अधिकाऱ्यांची व वाहनांची यादी सर्व विभागांनी तयार करुन ती या विभागास (गृह / परिवहन) तात्काळ

आहेत. अशा अधिकाऱ्यांच्या वाहनांवरील लाल / अंबर दिवा तातडीने काढून टाकण्याची कारवाई करण्यात यावी. तसेच पात्र नसताना देखिल लाल/ अंबर दिव्याचा वापर करीत असल्याचे पोलीस अधिकारी/ परिवहन अधिकारी या अंमलबजावणी अधिकाऱ्यास दिसून आल्यास त्यांनी संबंधित विभागाच्या सचिवांना त्वरीत कळवावे. या सुचनांचे उल्लंघन करणारे अधिकारी विभागीय कारवाईस पात्र ठरतील. आपल्या विभाग, नियंत्रणाखालील महामंडळे / मंडळे / प्राधिकरणे इत्यादी मध्ये अनधिकृतपणे लाल/ अंबर दिव्यांचा वापर करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या वाहनांची माहिती गृह ( परिवहन) विभागास दिनांक १० जून, २०१३ पर्यंत न चुकता पाठवावी. वरील सूचनांचे उल्लंघन विभागातील व विभागाचे नियंत्रणाखालील कोणत्याही अधिकाऱ्यांकडून होत नाही/ होणार नाही, याची जबाबदारी संबंधित विभागाचे सचिवांची राहील. त्यांनी याबाबत दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( जयन्त कुमार बाँठिया ) 3/5/13

मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा राज्यपालांचे सचिव.

मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव

मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव

सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव

सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

प्रशासनिक विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव

प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व जिल्हाधिकारी,

... विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / सर्व महामंडळे/ मंडळे/

दूरध्वनी क्र 022 22186116 E-Mail ID - home ... @maharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन

दिनांक :०९.०७.२०१३
वेळ : सकाळी १०.००

क्र. एमव्हीआर ०२१३ /प्र.क्र.४७/पु.बां.८०/परि-२
गृह (परिवहन) विभाग, मंत्रालय
वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई-४०० ००५
दिनांक : ०४ जुलै, २०१३.
फॅक्स : ०२२-२२१८८१६०

प्रति,

सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव

**विषय:- १) वाहनावर लाल/अंबर दिवा वापरण्याबाबत**
**२) वाहनाच्या काचावरील Black Flims न वापरण्याबाबत**

**महोदय,**

वरील विषयासंदर्भात मा.मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३ जून, २०१३ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडून पाठविण्यांत येत आहे.

२. वाहनावर लाल/अंबर दिवा वापरण्याबाबत व वाहनाच्या काचावरील Black Films न वापरण्याच्या अनुषंगाने दि.९ ऑगस्ट, २०१२, दि.२० ऑक्टोबर, २०१२ व दि.३ जून, २०१३ रोजी निर्गमित केलेले शासन आदेश सोबत जोडून पाठविण्यांत येत आहेत.

३. ३ जून, २०१३ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तातील मुद्यांच्या अंमलबजावणीबाबत आढावा घेण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील दि.९ जुलै, २०१३ रोजी सकाळी १०.०० वाजता त्यांच्या मंत्रालयातील समिती कक्षात बैठक आयोजित करण्यांत आलेली आहे.

तरी बैठकीस उपस्थित राहावे, ही विनंती.

आपला,

(स्वाक्षरी)

(रा.गो.गायकवाड)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत: मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
मा. प्रधान सचिव,(परिवहन) यांचे स्वीय सहायक
सह सचिव, गृह (परिवहन),यांचे स्वीय सहायक

G:\बैठकीची सूचना.docx

शासकीय वाहनांवर लाल/अंबर दिवा अनुज्ञेयतेबाबत तसेच वाहनांच्या काचांवरील ब्लॅक फिल्म काढून टाकण्यांबाबत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३ जून, २०१३ रोजी सायंकाळी ५.०० वाजता बैठक झाली सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) डॉ.प्रेमसिंग मीना, अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय

२) डॉ.शैलेश कुमार शर्मा, प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग

३) डॉ.छत्रपती शिवाजी, प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग

४) श्री .उज्वल उके, प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग

५) श्री.श्रीकांत सिंह, प्रधान सचिव, नगर विकास विभाग

६) श्री.मनोज सौनिक, प्रधान सचिव, वस्त्रोद्योग विभाग

७) श्री.व्ही.एल.अचलिया, प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग

८) श्री.मीता राजीवलोचन, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

९) श्री. व्ही.एन. मोरे, परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१०) श्री.विवेक फणसाळकर, सह पोलीस आयुक्त, वाहतूक

११) श्री.प्र.स. पाठक, सह सचिव, गृह निर्माण विभाग

१२) श्रीमती क.कि. पारकर, सह सचिव, सहकार विभाग

१३) श्रीमती शैला तारगे पाटील, सह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग

१४) श्री.यु.एल. वाघमारे, सह सचिव, नियोजन विभाग

१५) श्री.अजय अंबेकर, उप सचिव, राजशिष्टाचार विभाग

१६) श्री.बा.वि. निकम, उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग

१७) श्री.धबा परब, उप सचिव, पर्यावरण विभाग

१८) श्री.वानखेडे, उप सचिव तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

१९) श्री.अे.एम. आत्राम, उप सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग.

२०) श्री.उ.द. वाळुंज, उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

२१) श्री.उ.शि. लोणारे, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग

२२) श्री.शां.सि. कुदळे, उप सचिव, पाणी पुरवठा विभाग

२३) श्री.ध. कृ. राठोड, अवर सचिव, कृषि व पदुम विभाग

२४) श्री.धा.र. करंदीकर अवर सचिव, मराठी भाषा विभाग

२५) श्री.वि.ता. तांबे, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण विभाग

चर्चेअंती बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले :-

| अ.क्र. | बैठकीत घेतलेले निर्णय | निर्णयाची अंमलबजावणी करणारा विभाग | निर्णयाची अंमलबजावणी पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | सर्व शासकीय वाहनांवरील दिवे गृह विभागाच्या काढलेल्या आदेशाप्रमाणे वापर करावा. | सामान्य प्रशासन विभाग (राज्यशिष्टाचार) सर्व विभाग | तात्काळ |
| २ | शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक विभागाने लाल/अंबर दिवा अनुज्ञेयता असल्याची तपासणी करुन त्याची संपूर्ण माहिती गृह (परिवहन) विभागाला द्यावी. | सर्व विभाग | १५ दिवस |
| ३ | लाल/अंबर दिवे काढण्याबाबत निर्गमित केलेल्या परिपत्रकाची सर्व कार्यालयांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी व परिवहन विभागास आदेशाची प्रत संबंधित विभागानी पाठवावी. | सर्व विभाग | तात्काळ |
| ४ | शासकीय वाहनांवरील काळया फिल्म काढण्याची कार्यवाही करावी | सर्व विभाग | १५ दिवस |
| ५ | खाजगी वाहनांवर काळया फिल्म आढळून आल्यास प्रथम ५०००/- दुस-या वेळेस १०,०००/- व त्यानंतर आढळल्यास वाहन चालकाचे लायसन्स निलंबित करावे. | परिवहन विभाग | १ महिना |

*************

महाराष्ट्र शासन

तात्काळ / कालमर्यादा

क्रमांक : संकीर्ण-२०१३/प्र.क्र.३१६/प्रशा-५,
वित्त विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक — २४ जून, २०१३.

प्रति,

१) उप सचिव, विक्रीकर प्रशासन,

२) उप सचिव, कोषा प्रशासन,

३) उप सचिव, सार्वजनिक उपक्रम,

४) उप सचिव, राज्य लॉटरी व अल्पबचत,

विषय :- शासकीय वाहनांवर लाल / अंबर दिवा वापराच्या अनुज्ञेयतेबाबत.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयावरील प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग यांचे दिनांक २०.१०.२०१२ व मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक ३.६.२०१३ च्या परिपत्रकान्वये शासकीय वाहनांवर लाल / अंबर दिव्याचा वापर करण्याबाबत व वाहनाच्या काचेस काळ्या फिल्म्स (Black Films) काढण्याबाबत ~~तसेच सायरन वापरण्यास बंदी याबाबतचे~~ आदेश निर्गमित करण्यात आलेले आहत. (प्रती सोबत जोडल्या आहेत). या आदेशांचे पालन आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांनी तात्काळ केल्याची खात्री करुन पूर्तता अहवाल प्रशासन ५ कार्यासनाकडे पाठविण्याची विनंती आहे.

आपला,

( शिवाजी तु. धामणकर )
कक्ष अधिकारी, वित्त विभाग.

सहपत्र : दिनांक २०.१०.२०१२ व
दिनांक ३.६.२०१३ चे आदेश.

प्रत :

१) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सहपत्रांसह तात्काळ कार्यवाहीस्तव रवाना.

२) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सहपत्रांसह तात्काळ कार्यवाहीस्तव रवाना.

३) आयुक्त, राज्य लॉटरी व अल्पबचत, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सहपत्रांसह तात्काळ कार्यवाहीस्तव रवाना.

... मुंबई ... यांना सहपत्रांसह तात्काळ कार्यवाहीस्तव रवाना.